# BDC LIBRARY
## New Paper Clipping
*A.Y. 2024-2025*

# सोपानराव चव्हाण यांच्या वाढदिनी उद्या कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क



पाटण : येथील कोयना एज्युकेशन सोसायटी व महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण यांच्या ९० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने अभीष्टचिंतन सोहळा रविवार दि. १२ रोजी दुपारी दोन वाजता आयोजित केला आहे.

यानिमित्ताने प्रा. डी.डी. चव्हाण लिखित ' ज्ञानतपस्वी डॉ. सोपानराव चव्हाण' या चरित्र ग्रंथाचा प्रकाशन सोहळा आयोजित केला आहे. कोयना एज्युकेशन सोसायटीच्या येथील डॉ. एपीजे अब्दुल कलाम सभागृहात माजी सार्वजनिक बांधकाम व पर्यटनमंत्री विक्रमसिंह पाटणकर यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे. या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे उपस्थित राहणार आहेत. कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर उपस्थिती राहणार आहे. उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.